नि.फौ.मा.क्र. २०/२०१८
शासन–वि–राजीक + १
**निशाणी क्रं. ५८**

**सरकार तर्फे सा. क्र. ३ यांची साक्ष**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांवः विक्रांत रामधन राउत,
वय: ४९ वर्षे, धंदा– नोकरी,
रा. सहयोग सोसायटी,
यवतमाळ, ता. जि. यवतमाळ.

**सरतपासणी श्रीमती. एस. एस. कांबळे, सहा. सरकारी वकीलांमार्फत**

सन–२०१४ मध्ये मी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत होतो. माझ्या कडे प्रशासकिय अधिकारी पदाचा कार्यभार होता. मी किसन झींगरुजी राठोड यांना ओळखतो. ते त्यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी होते. वाघमारे अधिक्षक माझ्या कडे आले व त्यांनी मला राठोड हे दौऱ्यावर गेले असल्याचे सांगितले. त्यांनी मला राठोड यांच्या वतीने एफ.आय.आर. दाखल करण्याबाबत सुचना दिली. शेख राजीक याने खोटे नियुक्ती पत्र तयार करुन जिल्हा आरोग्य अधिकारी राठोड यांची खोटी सही करुन नियुक्त होण्याचा प्रयत्न केल्याबाबत ती तक्रार होती. आता मला छापील प्रथम खबर दाखविली. त्यावर माझी सही असून, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि. क्र. ५९** देण्यात येते.

०२. **उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे विधीज्ञ श्री. इमरान देशमुख–**

हे म्हणणे खरे आहे की, मला वाघमारे अधिक्षकांनी याबाबत लेखी आदेश दिलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, या संपुर्ण घटनाक्रमाची मला प्रत्यक्ष माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, छापील प्रथम खबर मध्ये माहीतीचा प्रकार लेखी स्वरुपात असल्याचे म्हटले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ती माहीती लेखी

कोणती होती याचा खुलासा यामध्ये केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी शेख राजीक याने खोटे नियुक्ती पत्र तयार करुन जिल्हा आरोग्य अधिकारी राठोड यांची खोटी सही करुन नियुक्त होण्याचा प्रयत्न केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी के. जी. राठोड यांच्या सांगण्यावरुन खोटी तक्रार दिली आहे.

**०३. <u>फेर तपासः</u>– काही नाही.**

वा. दा. ब. अ. क. के.

माझे समक्ष

Digitally signed by ARCHANA MOHAN SHAH
Date: 2026.02.10 16:16:35 +0530

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ
दिनांक १०/०२/२०२६.

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ